ISSN : 2278-9308

# Sanshodhan Samiksha

Humanities, Social Sciences, Commerce, Education, Law and Language

Monthly Peer Reviewed International Research Journal

**Special Issue April - 2017**




☐ Chief Editor - Prof. Virag S. Gawande
☐ Editor - Dr. Sanjay J. Kothari
☐ Editor - Dr. Dinesh W.Nichit

- PUBLISHED BY -

AADHAR SOCIAL RESEARCH & DEVELOPMENT TRAINING INSTITUTE, AMRAVATI, MS.

# INDEX


| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Prof. Smita Mohod | The Mystical element in the poetry of Sri. Aurobindo | 1 |
| 2 | Kavya Shree .K.M Dr. Manasa Nagabhushanamb . | Impact of Information and Communication Technology (ICT) on Buying Decision Process among Generation Cohorts- A conceptual approach | 4 |
| 3 | Ku.Shital.H. Ujade. | Female Foeticide and Infanticide In Maharashtra-India. | 16 |
| 4 | Prashant .S.Thakre | Open Educational Resources In Modern Information Systeam And Role Of Libraries And Lis Professionals. | 22 |
| 5 | Dr. Ajay Patalbansi | Developing Communication Skills in the Students of Rural Colleges | 26 |
| 6 | Prof. J. D. Sangode | Dr. Ambedkar Thoughts on Currency | 32 |
| 7 | Mr. Maske Vishal Balajirao | Vision Of Tradition And Religion In Paulo Coelho's Pilgrimage | 34 |
| 8 | .Prof. Shardul K. Buva | The Role of Finance in Growth and Development "The study of Role of Finance in Exports" | 41 |
| 9 | डॉ.संजय ह. पाटील | पिटर सिंगर यांचे 'प्राणिहक्क तत्वज्ञान' : एक तात्विक विवेचन | 47 |
| 10 | प्रा.अशोक पुंडलीकराव चौधरी | जीएसटी चे फायदे व सामान्य नागरीकांवर परिणाम | 60 |
| 11 | प्रा. श्रीमती शिंदे सुरेखा सतीश | विषय : स्त्री-पुरूष समानतेसाठी समतावादी अभ्यासक्रमाची पुर्नरचना | 64 |
| 12 | प्रा.डॉ. उल्हास एन. राठोड | शेतकऱ्यांची आत्महत्या - एक समाजशास्त्रीय चिंतन | 73 |
| 13 | डॉ. एन. एल. चव्हाण | आर्थिक सुधारणाकालीन औद्योगिक विकासाचा आढावा | 82 |
| 14 | प्रा. मोरे भास्कर निवृत्ती | संत एकनाथ | 88 |
| 15 | प्रा. डी. एच. आडे | काळा पैसा | 92 |
| 16 | प्रा. डॉ. अमिता बन्नोरे | गडचिरोली जिल्हयातील आश्रमशाळेत शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकास (वयोगट 6 ते 12 वर्षे) | 97 |
| 17 | डॉ. आर. पी. चौधरी | भारतीय शेतीची स्थितीगती | 103 |
| 18 | प्रा. मोहन बाबुराव चव्हाण | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य व शैक्षणिक योगदान | 108 |
| 19 | डॉ.एस.पी.देवरे | निती आयोग | 117 |

ISSN - 2278-9308

# पिटर सिंगर यांचे 'प्राणिहक्क तत्वज्ञान' : एक तात्विक विवेचन

डॉ.संजय ह. पाटील
(तत्वज्ञान विभागप्रमुख) देगलूर महाविद्यालय, देगलूर. ता.देगलूर जि.नांदेड - 431717.

आपल्या अगदी प्राथमिक अवस्थेपासून माणूस प्राण्यांचा उपयोग विविध कारणांसाठी करीत आलेला आहे. सर्वांत प्रथम अन्नासाठी म्हणून माणूस शिकार (Hunting) करावयाचा, नंतर तो मृगया, (मौज, छंद म्हणून होणारी शिकार) करु लागला. उदरभरण व शेती यासाठी प्राणी उपयुक्त आहेत, म्हणून त्यांचे पालन करण्यास माणसाने त्यानंतर प्रारंभ केला. पशुपालन हा त्याचा एक व्यवसाय होऊन गेला. सध्या मात्र माणूस प्राण्यांचा उपयोग मुख्यतः दोन गोष्टींसाठी करतो. पहिला म्हणजे प्रयोगासाठी (Experimentation) आणि दूसरा म्हणजे प्राण्याचे अन्न म्हणून एखाद्या वस्तूसारखे उत्पादन करण्यासाठी (Animal Farming) यापूढील भागामध्ये मी या बाबींची सविस्तर चर्चा करणारच आहे. उपरोक्त दोन मुख्य मुद्यांव्यतिरिक्त इतर अनेक उपयोगांमुळेच आपल्याला प्राण्यांच्या हक्कांची चर्चा करावी लागत आहे. मात्र तरीही या दोन उपयोगांमुळेच अभुतपूर्व अशा रीतीने माणूस आणि प्राणिविश्वामध्ये व त्यांच्या नैतिक विश्वामध्ये खळबळ उडाली आहे. या दोन प्रकारांसोबतच इतर काही उदा : कातड्यांचा वापर, प्राणिसंग्रहालये, प्राण्यांमध्ये होणारी स्पर्धा, रस्त्यांवर खेळ मांडून प्राण्यांचे शोषण करण्याच्या रीती, शोभेची वस्तू म्हणून मिरविणे, अशा अनेक रीतींबाबत चर्चा केली जाते.

मानवी संस्कृतीचा विकासच प्राण्यांच्या बलिदानावर उभारलेला आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्त ठरु नये. सर्वांत प्रथम माणूस निसर्गात फिरत असताना कंदमुळे आणि फळे यांच्याबरोबर प्राण्योंनाही मारुन खात असे. अर्थात, प्राण्ंयाची हत्या तो केवळ भक्ष्य या कारणासाठी करीत नव्हता, तर त्यामागे स्वतःच्या संरक्षणाचाही एक हेतू होता. मात्र शेतीच्या शोधतून त्याने पशुपालनास आरंभ केला, की शेतीच्या शोधाच्याही आधी त्याने पशुपालन आरंभ केला होता, यासंदर्भात मतभेद असल्याने या दोहोंचा आरंभ एकमेकांच्या मागेपुढे केव्हा तरी झाला असे मानावे लागेल. अर्थात, संस्कृतीच्या प्रत्येक टप्प्यावर तो प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात उपयोग करताना आढळतो. त्यामुळे सध्याच्या प्राण्यांच्या उपयोगाच्या मुळाशी त्याची हजारो वर्षांपासूनचीचालत आलेली मानवेतर प्राण्यांबाबतची वृत्तीच असल्याचे यातून स्पष्ट होते. प्राणी माणसाच्या उपयुक्ततेचे साधन आहेत, या विचारानेच आपल्याला ग्रासून टाकले आहे.

**मानवेतर प्राण्यांचे सध्याचे वापर**

१) शिकार (Hunting)

२) अन्न (Food)

३) प्रयोग, संशोधन, उत्पादन चाचणी, शिक्षण (Experimentation and for Research)

४) मनोरंजनासाठी होणारा वापर-प्राणिसंग्रहालय, सर्कस, प्राण्यांच्या विविध कसरती (झुंजी) दाखवून पैसे मिळविणे आणि त्यातून स्वत:चे पोट भरणे. (Entertainment)

५) व्यापार-प्राण्यांच्या कातडीचा आणि प्रत्येक अवयवांचा व्यापार (For Business)

वरील पाचही प्रकारांसाठी प्राण्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. याशिवाय धार्मिक कार्यामध्ये

प्राण्यांचा बळी देण्याची परंपरा तर काही पौर्वात्य आणि पाश्चात्य धर्मामध्ये आढळून येते. आपण अशा एका संस्कृतीचा भाग आहोत, ज्यामध्ये प्राण्यांना अन्नासाठी, प्रयोगासाठी, संशोधनासाठी, कपड्यांसाठी, नव्या औषधांच्या चाचणीसाठी-विकासासाठी, व्यापारासाठी बेदरकारपणे वापरले जाते. यातील अनेक प्रकारांमुळे (किंबहूना सर्वच) प्राण्यांना वेदना होतात. आपल्या व्यवहारातून होणाऱ्या वेदना पाहिल्या तर प्राण्यांना जीवनाचा किंवा वेदनामुक्त राहण्याचा अधिकारच नाही की काय असे वाटावे, अशी परिस्थीती आहे.

माणसांकडून प्राण्यांना देण्यात येणारी वर्तणूक तसेच माणसांकडून सध्या होत असलेला प्राण्यांचा वापर अतिशय चिंतनीय आहे. म्हणूनच प्राणिहक्कवादी या कृतींचे व प्रथांचे तसेच त्यातून उपस्थित होणाऱ्या विविध नैतिक मुद्यांची मांडणी व विश्लेषण करतात. प्राणिहक्कांची नैतिकमांडणी करतानाच त्याच्या प्रतिपक्षाचा आढावाही आपण घेणार आहोत.

प्राणिहक्क चळवळी या आरंभी मुख्यतः तीन उद्दिष्टांना अनुलक्षून काम करतात. त्यानुसार त्यांच्यामध्ये पुढील तीन प्रकार पाडले जातात.

१) कल्याणवादी (Welfarist)

२) फलवादी / फलप्रामाण्यतावादी (pragmatist)

३) सर्वंकषवादी (absolutist)

**१) कल्याणवादी :-**

कल्याणवादी मुख्यतः प्राण्यांच्या कल्याणाबाबत चिंतेत असतात आणि त्यांचा प्राणिहक्क असले पाहिजेत, अशी फलवाद्यांची भूमिका असते. मात्र किमान भविष्यातील काही काळापर्यंत तरी प्राण्यांचा माणसांकडून काही वापर आवश्यक आहे, हे त्यांना मान्य आहे. सर्वंकषवादी (Absoulist) हे या चळवळीतील अतिरेकी/कडवी भूमिका मांडणारे आहेत. प्राण्यांचा माणसांकडून होणारा साऱ्याच प्रकाराचा वापर तात्काळ थांबला पाहिजे, अशी त्यांची भूमिका आहे. वैद्यक क्षेत्रामध्ये प्रत्यक काम करीत असणाऱ्या कार्यकर्त्यांपुढे असलेल्या नैतिक द्विधा स्थितीच्या संदर्भात आत्मपरिक्षण करण्याची आवश्यकता आहे हे ध्यानी ठेवून नीतिशास्त्राच्या संदर्भाची चर्चा केली जाईल. शिवाय त्यातून सध्या आपल्याकडून होत असलेल्या प्राण्यांवरील प्रयोगाची नेमकी स्थिती काय आहे, याचा यासंबंधात (प्रयोग, शिकार आणि खाद्यासाठी प्राण्यांचा वापर करणे) काही नैतिक मार्गदर्शन करणारी समिती आहे का, हेध्यान घेऊन आढावा घेणेही शक्य होईल.

प्राणिकल्याणवादी या प्रकारामध्ये प्राण्यांना हक्क असतात या गोष्टींचा जास्त उहापोह केला जात नाही. तेही आपल्याप्रमाणेच पण गुणवत्तेमध्ये, क्षमतेमध्ये कमी आहेत. आपण त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ असल्यामुळे आपल्यावर जबाबदारी पडते की, आपण त्यांचे कल्याण पाहिले पाहिजे, असा दृष्टीकोन कल्याणवाद्यांचा असतो. यामध्ये प्राण्यांबाबत करुणा दाखवण्यास अधिक प्राधान्य असते.

**१) फलवादी :-**

फलवादी विचारसरणीमध्ये प्राण्यांना हक्क असतात व त्यांचा विचार केला जावा, असा आग्रह असतो. त्यांचे समान विचार आणि हितसंबंधावर आधारित असतात. त्यातूनच उपयुक्ततावादी दृष्टीकोन निर्माण होतो. त्यानुसार प्राण्यांना हितसंबंध असतात व ते माणसाच्या हितसंबंधांचा विचार करता, दोघांमध्ये सारखेपणा असतो. म्हणून माणसांना जर अधिकार असतील तर प्राण्यांनाही अधिकार असावेत व ते सारखेच असावेत असे सांगितले जाते. या गृहीत तत्वावरच हा विचार आकारलेला असतो. तथापि, असे असले तरीही काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये माणसाच्या हितसंबंधांचा विचार करता, प्राण्यांच्या हितसंबंधावर अतिक्रमण करण्यास काहीही हरकत नाही, अशा या वादाची भूमिका आहे. हा विचार पूर्णतः कल्याणवादी नाही किंवा सर्वंकषवादी नाही, तर तो दोन्हींचा मध्य साधणारा आहे. असाच दृष्टीकोन पीटर सिंगर या तत्वज्ञाने आपल्या प्रतिपादनामध्ये मांडला आहे.

**१) सर्वंकषवादी :-**

तिसरा दृष्टीकोन हा सर्वंकषवाद्यांचा आहे. त्यांच्या मते माणसातर्फे केले जाणारे प्राण्यांचे सारे उपयोग त्वरीत बंद केले पाहिजेत. शिकार, अन्नासाठी व प्रयोगासाठी तो प्राण्यांचा उपयोग माणूस करीत असतो, तेव्हा प्राण्यांच्या नैतिक हक्कांची स्थापना कशी करता येईल, याचा विचार या भूमिकेच्या प्रवर्तकांकडून केला जातो. सर्वंकषवादी किंवा संपूर्ण हक्कवादी दृष्टिकोनाची चर्चा टॉम रेगनने आपल्या 'द केस फॉर ॲनिमल राईटस' या पुस्तकामध्ये केली आहे. तो म्हणतो, "जैवघटक म्हणजे इतरांच्या हितसंबंधांसाठी आवश्यक असणाऱ्या आपल्या साधनीभूत मूल्यांपासून स्वतंत्र असे साधकबाधक जीवन जगणारे जीव, अशा जिवांनाच मूलभूत नैतिक अधिकार असतात".[१] अशा जैवघटकांना भावना आणि प्राधान्यक्रम असतात. याची स्पष्ट उदाहरणे साधारणतः एका वर्षापर्यंत सामान्यपणे वाढ झालेल्या सस्तन प्राण्यांमध्ये दिसतात, असे रेगनचे म्हणणे आहे. रेगनच्या म्हणण्याप्रमाणे मानसिक क्षमता कशाही असोत, जैव घटकांना 'समान अंगभूत मूल्य' म्हणजेच समान 'नैतिक स्थान' असते. आणि या मूल्यामुळेच नैतिक घटकांनी त्याला अधिकाधिक सन्मान दिला पाहिजे. थोडक्यात, सर्व जिवांना त्यांची प्रजाती कोणतीही असो, आणि नैतिक घटकांबाबतचे त्यांचे मूल्य काहीही असो, समान मूलभूत नैतिक अधिकार असतो. त्यांच्या या भूमिकेतूनच माणसांकडून होणारा प्राण्यांचा सर्वप्रकारचा वापर थांबविला पाहिजे, असे सुचविण्यात आले आहे.

पारंपरिक नीतिशास्त्रामध्ये मूल्य, कर्तव्ये, अधिकार वगैरेंसाठी आधार म्हणून मनुष्यकेंद्रितता विकसित झालेली आढळते. पर्यावरणीय नीतिशास्त्राची जडणघडण होत असताना त्यात नैतिक विचारपात्रतेचा निकष हा फक्त माणसापुरताच विचार करून चालत नाही. तर या पारंपरिक दृष्टीकोनाची व्याप्ती वाढवून त्यामध्ये मानवेतर निसर्ग, प्राणी, वनस्पती व सूक्ष्म जीवसृष्टी व निर्जीव सृष्टी यांचा समावेश करता येईल काय, त्यांनही नैतिक व कायदेशीर विचारपात्र ठरविता येईल काय, याचा विचार झ ाला. हा प्रश्न निर्माण झाला त्या वेळेस अशा नीतिशास्त्राची बांधणी या क्षेत्रामध्ये अनेक नीतिशास्त्री करु लागले. त्यामध्ये जे.जी.वार्नाक, विल्यम फ्रँकेना, जोएल फिनबर्ग यांचा समावेश आहे. त्यांनी नैतिक विचारपात्रतेची व्याप्ती वाढविली, जेणेकरुन त्यामध्ये मानवेतर निसर्गविश्वाचाही समावेश करता येईल.

नैतिक विचारपात्रतेची व्याप्ती वाढविण्यासाठीच्या वार्नाकच्या युक्तिवादामध्ये पारंपरि नीतिशास्त्रातील विवेक या निकषालाच सुरुंग लावण्यात आला आहे.

**पारंपरिक युक्तिवाद :-**

जहाल मतानुसार " 'क्ष' या व्यक्तीचा 'अ' या व्यक्तीकडून नैतिक विचार (morally consider) होण्यासाठी 'क्ष' ही व्यक्ती विवेकी माणूस असली पाहिजे आणि दूसऱ्या थोड्याशा उदार मतानुसार "क्ष ही व्यक्ती 'अ' या व्यक्तीच्या नैतिक विचारास तेव्हाच पात्र होईल, जेव्ही ती एकतर विवेकी माणूस असेल किंवा किमान विवेकक्षम मांणूस (is a potential rational) असेल".

**वार्नाकचा प्रतिवाद :-**

पहिल्या युक्तिवादातील निकषामुळे मुले, मानसिक, विकलांग (Mentally Handicapped), प्रौढ आणि इतर अनेकांना नैतिक विचारपात्रतेमधून (Moral Consideration) वगळावे लागेल. कारण त्यांना विवेक नसतो. दुसऱ्या युक्तिवादातील निकषामुळे अभ्रके (infants) नैतिक विचारपात्र असतील आणि त्याचप्रमाणे उपचार होऊ शकणारे मनोविकलांगही असतील, कारण ती विवेकक्षम असतात. पण उपचारापलीकडे गेलेली वेडी माणसे मात्र या विचारपात्रतेून वगळावी लागतील, कारण ती विवेकीही नाहीत किंवा विवेकक्षमही नाहीत.

या दोन्ही युक्तिवादानूसार नैतिक विचारक्षमता ही केवळ विवेकी माणूस किंवा विवेकक्षम माणूस यांच्यापुरतीच मर्यादित आहे. तथापि, वार्नाकला हे मान्य नाही. त्यासाठी त्याने नैतिक कृती म्हणजे काय याचे आधी स्पष्टीकरण दिले आहे. त्याच्या मते, "नैतिक कृतीद्वारे एखाद्या संकटातून मार्ग काढण्याच्या एखाद्या नैतिक घटकाची त्याच्या सर्वसाधारण क्षमतेनुरुप आणि म्हणूनच त्याच्यापुरतीच मर्यादित असणारी जबाबदारी निश्चित होते. त्याचप्रमाणे नैतिक कृतीचा लाभार्थी (Beneficiary) होण्यासाठी त्या कृतीचे परिणाम सहन करण्याची दुसऱ्या घटकाची क्षमता ही अट असते आणि त्यामुळेच ती बाब केवळ विवेकी जिवांपुरतीच मर्यादित नसते".[२] म्हणजे 'क्ष' या घटकाने केलेल्या कृतीचा लाभार्थी होण्यासाठी 'अ' या घटकामध्ये त्या कृतीचे परिणाम त्या व्यक्तीला भोगावे लागतातच. (उदा. माणसाने सिंहाला गोळी मारणे). म्हणूनच नैतिक विचारपात्रतेचा निकष हा दुःख होण्याच्या क्षमतेमध्ये केंद्रित झालेला आहे. मनुष्यकेंद्रित नैतिक विचारपात्रतेच्या अटीची विवेक ही क्षमता त्याने या पध्दतीने 'दुःख होण्याची क्षमता' यामध्ये परावर्तीत केली आहे. थोडक्यात, 'अ' या व्यक्तीच्या कृतीमुळे 'क्ष' या व्यक्तीला दुःख (किंवा आनंद) होणार असेल, तर आणि तेव्हाच 'क्ष' ही व्यक्ती 'अ' या व्यक्तीकडून नैतिक विचार होण्यास पात्र ठरू शकेल.

**फ्रँकेनाचा प्रतिवाद :-**

"प्राणी, वेडे किंवा मूर्ख लोक हे जरी व्यक्ती किंवा माणूस ठरत नसले तीही त्यांना योग्यायोग्य वागविण्याच्या पध्दती आहेत. अशा मंडळींचे जीव केवळ इतर माणसांसाठी महत्वाचे असतात किंवा आहेत म्हणून नव्हे तर त्यांना दुःखी किंवा आनंदाची संवेदना आहे. म्हणून त्यांना नैतिक विचारास पात्र समजावे".[३]

२२७८-९ पारंपरि

ISSN - 2278-9308

**जोएल फिनबर्गचा प्रतिवाद :-**

"दु:ख, संवेदना हा हितसंबंध असण्याचा एक निकष आहे. श्रध्दा किंवा जागृती गृहीत असणाऱ्या इच्छा, आकांक्षा यातून हितसंबंध आकरास येत असतात. हितसंबंधाच्या अटीची पूर्तता केल्याशिवाय एखादा जीव नैतिक विचारास पात्र आहे, असे स्पष्टपणे म्हणता येणार नाही".[४]

या तिघांच्याही प्रतिपादनातून हे स्प्ष्ट होते की,पारंपरिक नीतिशास्त्राची व्याप्ती काही प्रमाणात वाढली असून, त्यामध्ये एखाद्या घटकाचा नैतिक विचार होण्यासाठी विवेक नव्हे, तर सुख दु:खाची क्षमता (जाणीवक्षमता) हा निकष ठरतो आहे. वार्नाकच्या मते नैतिक विचारपात्रतेसाठी दु:ख होण्याची क्षमता हा निकष आहे, फ्रँकेनाच्या मते दु:खाची तसेच आनंदाची क्षमता एखाद्या जिवामध्ये असेल तर तो नैतिक विचारास पात्र ठरतो. फिनबर्गच्या मते दु:खसंवेदना हा हितसंबंध असण्याचा एक निकष आहे आणि हितसंबंध असणे, ही बाब एखाद्या जिवाला अधिकार असण्यासाठी महत्वाची असते.

थोडक्यात, वॉर्नाक म्हणतो की, जाणीवक्षमताहीन जीव हे नैतिक कृतीचे योग्य लाभार्थी असू शकत नाहीत. फ्रँकेनाच्या मते, जाणीवक्षमताहीन जिवांकडून त्यांचा आपण आदर करावा यासाठी नैतिक कारणे मिळत नाहीत, फिनबर्ग हितसंबंधाच्या अटीचा संबंध मानसिक क्षमतांशी लावतो व त्या आधारावर नैतिक विचारार्हता ठरवितो.

तिघांच्याही प्रतिपादनाच्या या मर्यादा आहेत. कारण या रीतीमुळे नैतिक विचारपात्रतेची व्याप्ती माणसांव्यतिरिक्त काही अन्य जिवांचा समावेश करण्यासाठी वाढत असला तरीही तीमधून काही जीव वगळले जातात. अर्थातच, या मुद्यांचा खुलासा पुढे संदर्भानुरुप येणार आहे.

तेव्हा नैतिक विचारपात्रतेच्या व्याप्तीमध्ये आधी केवळ माणसाचा समावेश होतात, तर नव्या विस्तारामुळे त्यामध्ये मानवेतर नैसर्गिक विश्वाचाही काही प्रमाणात समावेश होणे शक्य झाले आहे. म्हणजेच विवेक या निकषाची कोंडी फोडून मनुष्यकेंद्रिततेला जाणीवेच्या युक्तिवादामुळे पहिला धक्का बसला.

पर्यावरणीय नीतिशास्त्राच्या विकासाच्या या टप्याच्या पुढे आरंभ होतो. तो प्राण्यांचे हक्क किंवा प्राण्यांचे कल्याण या विचारांचा. नैतिक विचारपात्रतेच्या कक्षा रुंदावण्यासाठी जाणीवक्षमता (Sentientency) (म्हणजेच सुख-दु:खाची संवेदना) हा निकष ठरविण्यात आल्याने किमान काही मानवेतर जीवनाचा त्या चौकटीमध्ये समावेश झाला. पण तरीही असा विचार करण्याचे स्वरूप या विचारविकासाच्या प्रक्रियेत अद्यापही स्वेच्छाधीन (voluntars) स्वरुपाचेच आहे. कारण त्यासाठी कोणतीही बंधने (obligation) किंवा ठाम कर्तव्ये (duties) यांची आखणी झालेली नाही. नेमके हेच सूत्र पकडून पिटर सिंगर आणि टॉम रेगन यांनी त्यांच्या प्राणिकल्याण आणि प्राणिहक्क युक्तिवादाची उभारणी करीत पर्यावरणीय नीतिशास्त्राला एक वेगळा आयाम प्राप्त करुन दिला आहे.

प्राणिहक्काच्या विचारात पिटर सिंग आणि टॉम रेगन या चिंतकाचा विचार पुढीलप्रमाणे :

**पिटर सिंगर :-**

पिटर सिंगर हा समकालीनांमधील एक विचारवंत आहे. उपयोनियोजित नीतिशास्त्रातील एक प्रभावी विचारवंत या नात्याने त्याने पर्यावरणीय नीतिशास्त्र विकसित केले आहे.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात 'मानवकेंद्रिततेवर आधारित नीति' या संकल्पनेला जबर धक्का दिला. पिटर सिंगर (Peter Singer) या तत्ववेत्याने कृष्णवर्णीय माणसांची मुक्ति चळवळ, स्त्री मुक्ती चळवळ यांच्या धर्तीवर मानवेतर प्राण्यांसाठी मुक्तिचळवळ (Animal Liberation Movement) सुरु झाली पाहिजे, हा विचार १९७३ साली (ॲनिमल लिबरेशन) या लेखात प्रभावीपणे मांडला. तो म्हणतो, "मुक्तिचळवळ आपल्या नीतिची क्षितिजे रुंदावण्याची मागणी करते. त्यामुळे आजपर्यंत जे वर्तन ज्या रुढी, जे संबंध नैसर्गिक आणि अटळ वाटत होते, तेच आता अनैतिक आणि असभ्य वाटू लागतात".[५]

सर्व दूषित परंपरागत दृष्टीकोन बदलून माणूस म्हणून माणसाचे सर्व हक्क प्रदान करणे आपले नैतिक कर्तव्य आहे हे आपण स्वीकारले. त्याचप्रमाणे प्राण्यांविषयीचा शोषणात्मक दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे अन्य व्यक्तींना दुःख देणे, इजा करणे हे अनैतिक आहे त्याचप्रमाणे प्राणिमात्रांना दुःख देणे, इजा करणे हे अनैतिक आहे असे सिंगरचे प्रतिपादन आहे.

पिटर सिंगर आपल्या समान हितसंबंधाच्या विचाराचे तत्व (Principle of equal consideration of interests) बेंथामच्या नीतिविषयक मतावर आधारतो. बेंथामच्या मते 'प्राण्यांना दुःखाची संवेदना असते', जर प्राण्यांना दुःखाची संवेदना असेल तर आपण प्राण्यांशी वागताना त्यांच्या दुःखाचा विचार न करणे. नैतिकदृष्ट्या समर्थनीय असू शकत नाही आणि प्राण्यांची दुःख, वेदनाही मनुष्याच्या दुःख वेदनेशी समान मानावी लागेल. अशाप्रकारे दुःख देणे वाईट आहे. हा निष्कर्ष स्वीकारुन सिंगर नीतीची कथा सर्व संवेदनशील प्राण्यांपर्यंत विस्तारतो. नीतिविषयक पाश्चात्य संकल्पनेतील हा बदल क्रांतीकारक आहे.

आपल्या नैतिक विचारामध्ये विवेकाच्या भूमिकेल पिटर सिंगरच्या नीतिशास्त्रविषयक दृष्टिकोनामध्ये मान्यता मिळवून देण्यात आली आहे. नैतिक प्रमाणकानूसार जीवन व्यतीत करण्याची नेमकी कल्पनाच आपल्या अशा रीतीने जीवन जगण्याच्या समर्थनाशी अगदी निकटतेने संबंधित आहे, हे आपण कबूल करतो. यातूनच ही विवेकाची भूमिका नेमकी व्यक्त झालेली आहे. नैतिक समर्थन हे केवळ स्वहिताच्या संबंधात दिले जाऊ शकत नाही. त्यामध्ये इतरांच्या (अन्य प्रजातीही) हितसंबंधांचा विचार झाला पाहिजे, असे त्याने नमूद केले आहे. नीतिशास्त्राच्या या वैश्विक अंगामुळे एखादी उपयुक्ततावादी भूमिका स्वीकारण्यासाठी पटेल अशी आधारभूमी मिळते, असे त्याचे म्हणणे आहे. तेव्हा, माझ्या हितसंबंधाबाबत मी स्वतःच चिंतेत असेन तर इतरांच्या तशाच हितसंबंधाबाबतही मी तेवढाच चिंतेत असलो पाहिजे. यातूनच "ज्या कृतीमधून तौलनिकदृष्ट्या साऱ्यांसाठीच चांगली परिणती होणार असेल त्या कृतींचा आपण स्वीकार केला पाहिजे,"[६] या भूमिकेची मांडणी होते.

काही तत्वज्ञ असे म्हणतात की, आपल्या नैतिक विचारांमध्ये आपण हितसंबंधांचा केवळ 'हितसंबंध' असाच विचार केला पाहिजे. हे जर स्वीकारले तर समान हितसंबंधांचा समान विचार हेच समतेचे मूलभूत तत्व आहे, असे आपण म्हणून शकतो, असे सिंगरचे म्हणणे आहे सिंगर म्हणतो, "समान हितसंबंधांचा समान विचार करण्याच्या तत्वाचे सार म्हणजे आपल्या कृतीमुळे ज्यांच्यावर परिणाम होतो किंवा होणार आहे, त्या साऱ्यांच्या समान हितसंबंधांचा सारखाच विचार केला पाहिजे".[७] (समान

ISSN - 2278-9308

हितसंबंधाच्या विचाराचे तत्व) (Principle of equal consideration of interests) या तत्वाची व्याप्ती माणूस या प्रजातीच्या मर्यादा ओलांडून पुढे जाणारी आहे, असे त्याचे म्हणणे आहे. एकदा का आपल्या प्रजातींच्या सदस्यांमधील नातेसंबंधात हे तत्व मान्य केले की, तेच तत्व अन्य प्रजातींच्या, म्हणजेच मानवेतर सदस्यांशी असलेल्या आपल्या संबंधाच्या संबंधात आपण एक आधार म्हणून स्वीकारले पाहिजे, असे सिंगर म्हणतो. वंश, लिंग किंवा बुध्दिमत्ता यांच्या आधारावर आपल्याच प्रजातींच्या काही सदस्यांचे हितसंबंध दुर्लक्षिणे जर अयोग्य असेल तर प्राणिप्रजातीच्या सदस्यांचे हितसंबंध हे कमी बुध्दिमत्तेचे आहेत, म्हणून दुर्लक्षिणेही तितकेच अयोग्य आहे, असे सिंगरचे म्हणणे आहे. तेव्हा प्राणी आपल्या प्रजातीत नाहीत, या एकाच कारणास्तव आपण त्यांची पिळवणूक करुच शकत नाही.

**बेन्थाम :-**

सुख दुःखाची संवेदना असणे हीच हितसंबंध असण्याची एक आवश्यकता आहे, असे सिंगरचे म्हणणे आहे. आणि ते जेरेमी बेन्थामच्या मतानूसार आहे. तेव्हा एखाद्या जिवाचे स्वरुप काहीही असो, इतरांच्या तशाच दुःखाइतकाच त्यांच्या दुःखाचा सारखेपणाने विचार झाला पाहिजे, असे म्हणणे समतेच्या तत्वानूसार आवश्यक ठरते. सिंगरच्याच शब्दांत सांगावयाचे तर, “इतरांच्या हितसंबंधाच्या चिंतेबाबत जाणिवतेची मर्यादा हीच एकमेव समर्थनीय सीमारेषा असू शकते”.[८] त्यामुळेच, आपल्या नैतिक विचारविमर्शामध्ये आपण साऱ्या जाणीव-जीवांचे माणूस आणि मानेवतर प्राणी, स्वभाव असलेल्या आणि नसल्याचे हितसंबंध ध्यानात घेतले पाहिजेत. मानवेतर प्राण्यांनाही नैतिक विचारपात्र ठरवून सिंगरने एक बिगर प्रजातीवादी दृष्टीकोन दिला आहे.

सिंगरच्या बिगर-प्रजातीवादी नीतिशास्त्रामध्ये व्यक्त झालेल्या बिगर मनुष्यकेंद्री व्यक्तिवादामध्ये किमान दोन गृहितके आहेत-

पहिले म्हणजे त्यामध्ये केवळ व्यक्तीच (एकवचनी) अधिकारधारक असू शकते, असे मानण्यात आले आहे. कारण केवळ वैयक्तिक जिवामध्येच जाणिवेची क्षमता असते.

दुसरे म्हणजे एखादी व्यक्ती तेव्हाच वास्तवात असते, जेव्हा तिला पाहणे किंवा तिचा प्रतिवाद करणे शक्य असते. या दोन गृहितकांच्या स्वीकारामुळे आपल्या विचारांमधून प्रजाती, परिसंस्था यासारख्या साऱ्या संपूर्णवादी नैतिक सुमदायाला वगळणे सिंगरला शक्य झाले आहे.

स्वतः हक्कवाद्यांऐवजी उपयुक्ततवादी असूनही सिंगरने प्राणिमुक्तीविषयी आपल्या आरंभिकलिखाणामध्ये पुढील मुद्दा हिरीरीने मांडला आहे. असा अधिकार कोणाला आहे याचा आपला निर्णय नैतिकदृष्ट्या बिनमहत्वाच्या गुणविशेषावर आधारलेला असू नये. इतिहासामध्ये शक्तिशाली माणसांनी वंश, लिंग, लैंगिक वृत्ती, धर्म, विचारसरणी, वर्ग-दर्जा, संपत्ती आणि तत्सम गुणांनुसार अधिकार ठरविले आहेत. फाजील धार्मिक हट्टाचा हा आदर्श नमुना आहे. वंश, लिंग आदी बाबींमुळे जर दोन व्यक्तींमध्ये भेद असतील तर त्यांना वेगळी वागूणक दिली जाऊ नये. याचा अर्थ असा की, त्यांना सारख्याच मार्गाने वागवावे. केवळ स्त्रीलाच गरोदरपणाचे लाभ मिळू शकतात. सिंगर याच मुद्याची मांडणी पुढीलप्रमाणे करतो.

व्यक्तीच्या कोणत्याही हितसंबंधाचा सारखाच विचार केला पाहिजे, अर्थातच, या हितसंबंधामुळे दुसऱ्याच्या अधिकाराचे उल्लंघन होत नाही, हे गृहीत धरले आहे.

तथापि, उपयुक्ततावादामध्ये काही ठाम मुद्दे आहेत, जे अगदी पर्यावरणीय संदर्भातही सहजगत्या नाकारता येण्याजोगे नाहीत. उपयुक्ततावादाचा मध्यवर्ती भाग म्हणजे प्रत्येक जाणीवक्षम जिवाच्या हितसंबंधांचा किंवा प्राधान्यांचा समावेश करण्याइतपत आपण काळजी घेतली तर असे दिसले की, किमान जाणीवक्षम जिवांचा संबंध असलेले पर्यावरणीय प्रश्न आपण सोडवू शकू.

प्राण्यांना दिली जाणारी वागणूक अलीकडच्या काळात नैतिक तत्वज्ञांच्या चर्चेची आणि त्यांच्यामध्ये त्या मुद्याबाबत कुतूहल निर्माण करणारी ठरली आहे. अन्नासाठी वाढविल्या जाणाऱ्या आणि प्रयोगासाठी वापरल्या जाणाऱ्या प्राण्यांच्या जीवनाबाबतची माहिती अधिक व्यापक झाली आहे, हे त्याचे कारण नाही किंवा अनावश्यक दु:खापासून प्राण्यांचे संरक्षण झाले पाहिजे हे ही त्याचे कारण नाही, तर माणसाच्या हितसंबंधाचा ज्या रीतीने नैतिक विचार केला जातो, त्याचप्रमाणे प्राण्यांचे हितसंबंधही नैतिक विचारास पात्र असल्याने त्यांना दिली जाणारी वागणूक आणि त्यांचा होणारा वापर नैतिकदृष्ट्या अस्वीकारार्ह आहे, या प्रतिपादनामूळे या चर्चेला अधिक तात्विक जोर मिळाला आहे.

प्राणिमुक्तीवादी नैतिक स्थान केवळ जाणीवक्षम जिवांपुरतेच मर्यादीत ठेवतात. त्यामागे केवळ जाणीवक्षम जिवांनाच हितसंबंध आणि स्वत:चे असे कल्याण असू शकते, ही धारणा आधारभूत आहे झाडे, नद्या, पर्वत हे वासना आणि भावना असणारे जाणीवक्षक जीव असू शकत नाही. आणि त्यामुळे सौंदर्यानुभूतीचे लक्ष्यविषय असले तरीही ते नैतिक चिंतेचे केंद्र असू शकत नाही.

प्राण्यांना कसे वागविले जावे याबाबतच्या बंधनाचे वेगळे स्वरूप उपयुक्ततावादी मांडतात. या दृष्टीकोनामध्ये किमान त्याच्या एका प्रकारामध्ये तरी दोन तत्वांचा समावेश होतो. पहिले तत्व समतेचे तर दूसरे आहे उपयुक्ततेचे.

समतेच्या तत्वानूसार जिवांच्या इच्छा, गरजा, आकांक्षा या त्याच्या दृष्टीने सारख्याच महत्वाच्या असतात. तेव्हा असा जीव राजा असो वा भिकारी, प्रतिभासंपन्न असो वा नसो, काळा असो वा गोरा, नर असो वा मादी, माणूस असो वा प्राणी, या इच्छा, गरजा, आकांक्षा, सारख्याच असतात. असे या तत्वामध्ये अभिप्रेत आहे. हितसंबंधाच्या (हेतूंच्या) समतेचे हे तत्वच वर्णभेद, लिंगभेद व सिंगरच्या मताप्रमाणे प्रजातीवाद यासारख्या पूर्वग्रहांना टाळण्याचा तात्विक आधार बनले आहे.

उपयुक्ततेच्या तत्वानूसार ढोबळ बोलावयाचे झाले तर चांगल्याचा वाईटावर विजय व्हावा या दृष्टीने आपण जास्तीतजास्त प्रयत्न करावयाचा असतो. उदा. संबंधित सर्व प्राण्यांचा हितसंबंध ध्यानात घेऊन आणि समान हितसंबंधाचा समान विचार करुनच, असमाधानापेक्षा अधिक समाधान मिळविता येईल, असा आपला प्रयत्न राहिला पाहिजे. आता प्राण्यांनाही हितसंबंध असतो, त्यामुळे तो ध्यानात घेतला पाहिजे आणि माणसासाठी माणसाचा हितसंबंध जेवढा महत्वाचा आहे, तितकाच त्यांनाही त्यांचा हितसंबंध महत्वाचा असल्याने माणसाच्या हितसंबंधाइतकेच महत्व त्यालाही दिले पाहीजे. कुत्र्याला लाथाडणे किंवा मांजराच्या शेपटीला पलिता बांधणे हे उपयुक्ततेच्या तत्वाच्या विरोधात असल्याने या दृष्टीकोनानूसार ते चुकीचे आहे.

वंशिक समतेसाठी असणारा पुरेसा तात्विक आधार सिंगर जेरेमी बेन्थामच्या पुढील विवेचनातून येतो. बेन्थामच्या मते, "एक दिवस असा येईल की, आत्तापर्यंत केवळ अन्यायातूनच प्राणिविश्वाला ज्यापासून दूर ठेवले आहे असे अधिकार त्याला मिळतील. फ्रेंचांनी आताच हे शाबित केले आहे की,

त्वचेचा काळा रंग हा एखाद्याला त्याची छळवणूक करण्यापासून मुक्त करण्याचे कारण होऊ शकत नाही. एक दिवसा असा येईल की, पायांची संख्या, त्वचेचा रंग, या बाबी एखाद्या संवेदनक्षम जिवाला विषम वागणूक देण्याचे पुरेसे समर्थनीय कारण असू शकणार नाही. अनुल्लंघनीय रेषा कशी शोधता येईल ? हा आधार विवेकाची क्षमता किंवा बोलण्याची क्षमता हा आहे का ? तथापि, एखादा पूर्ण वाढ झालेला कुत्रा किंवा एखादा घोडा हा एखाद्या दिवसाच्या, आठवड्याच्या किंवा महिन्याच्या मुलापेक्षा अधिक विवेकी आणि संवेदनशील असतो. समजा तसे नसते तरीही त्यातून काय साध्य झाले असते ? त्यांच्यात कारणमीमांसा करण्याची क्षमता आहे का, किंवा ते बोलू शकतात का, हा प्रश्न नाही तर त्यांना वेदना होतात का हा प्रश्न आहे''.[९]

बेन्थामचे हे प्रतिपादन सिंगरने आपल्या मताच्या आधारासाठी घेतले आहे. त्याच आधारावर एखाद्या जिवाला वेदना होत असतील तर त्या विचारात न घेण्याचे व मूल्य न देण्याचे काही नैतिक समर्थन असू शकत नाही, असे त्याला वाटते.

आत्तापर्यंत आपण सिंगरच्या प्राणिहक्क तत्वज्ञानाचे विचार पाहिले. जरी त्याची कामगिरी बहुमूल्य असली तरी त्याच्या ठाम दृष्टीकोनावर काही आक्षेप घेता येतात. त्यांचा विचार आता करु.

''एखाद्या जिवाला समान विचाराचा अधिकार देणारे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे दुःखाची क्षमता, कारण सुख-दुःखाची क्षमता असणे ही बाब हितसंबंध असण्याची पूर्व आवश्यकता आहे''.[१०] नैतिक मूल्ये हे अखेर दुःख टाळणे आणि त्यावर प्रतिबंध करणे यावर अवलंबून असते. ही उपयुक्ततावादी उपपत्ती सिंगरला मान्य आहे, प्राण्यांना दुःखाची क्षमता असल्याने त्यांनाही समान विचारांचा हक्क आहे.

**प्रतिवाद / आक्षेप :-**

हितसंबंध असण्याची परिस्थिती प्राणी आणि माणूस या दोघांच्या बाबतीत सारखीच असल्याच्या आधारावर समतेचे तत्व या दोघांनाही लागू होते, असा त्यांचा दावा आहे. पण परिस्थिती सर्वथैव सारखीच आहे, असे मानने चुकीचे आहे. प्राणी आणि माणूस यांच्यामध्ये नैतिक भेद आहेत ते पूढीलप्रमाणे.

''एखाद्याला त्याच्या स्वतःच्या कल्याणामध्ये, ज्यात केवळ भौतिक कल्याणाचाच (पुरेसे अन्न, पाणी आणि निवारा) नव्हे तर प्राथमिक कल्याणाचा (धोका आणि हानी यांपासून मुक्ती), हितसंबंध असतो हे स्पष्ट आहे. प्राथमिक हितसंबंधावर ज्यामुळे परिणाम होतो, त्यामध्येही एखाद्याचा हितसंबंध असतो. असे असले तरी आपल्या कल्याणवर परिणाम करणाऱ्या विविध घटकामंध्येच माणसाचा हितसंध असतो असे नाही तर त्यामध्ये रसही घेऊ शकतात. एखाद्या गोष्टीमध्ये रस घेण्यासाठी एखाद्याचा हितसंबंध काय आहे आणि एखाद्याच्या हिताचे काय आहे हे समजून घेणे आवश्यक असते, या परिस्थितीमुळे एखाद्याच्या हितसंबंधावर परिणाम करणारे घटक आहेत, हे ओळखण्याची व्याप्ती समजून घेण्याची शक्यता त्यासाठी आवश्यक असते. माणूस त्याच्या विश्वाशी एपिस्टेमिक (Epististemic) नात्यामध्ये असतो, त्यामुळे माणूस आणि प्राणी यांच्यामधील हितसंबंधाचा प्रकार सारखाच असला तरीही माणसाचा हितसंबंध वेगळा असतो''.[११] त्याचा आधार असा.

माणसांचे हितसंबंधाशी वेगळेच नाते असते, असे नाही तर त्यांचे वेगवेगळ्या प्रकारचे हितसंबंधही असतात. माणसांमध्ये योजना व प्रकल्प असण्याची आणि ते विकसित करण्याची क्षमता असते. माणूस

भविष्यलक्ष्यी असतो, किंवा माणूस आज जे काही करतो त्यामागे भविष्यातील माणसांच्या अपेक्षांचे ज्ञान असते. या अपेक्षा माणसाचे अनुमान आणि माणसांनी स्वतःसाठी आखलेल्या योजनांचा परिणाम असतो. जेव्हा एखाद्याला रस घेता येतो तेव्हा तो घेत असलेल्या रसाची व्याप्ती प्राथमिक मानसिक गरजांची पूर्तता याच्याही पलिकडे जाणारी असते. तेथे प्राथमिक मानसिक गरजा याचा अर्थ प्राणी भावनिक स्तरावर अनुभवत असलेल्या अनुभवांशी थेट संबंधित असतात. उदाहरणार्थ, कत्तलखान्यातील रक्ताच्या वासाने येणारी भीती, पोट भरलेले असताना मिळणारी परिपूर्णतेची भावना, अतीव परिस्थितीमुळे असणारी, निर्माण होणारी अधिरता.

माणसाच्या हितसंबंधांमध्ये त्याही पलिकडे भावनिक घटक असतो. भय, अनुमान, आशा आणि दुःख ही माणसांच्या हितसंबंधांची वैशिष्ट्ये असून प्राण्यांच्या हितसंबंधांमध्ये ती नसतात. भावनांमधील अशा परिणामांमध्ये संबंधित ज्ञानाची शक्यता गृहीत धरल्यासारखी असते. वरील भावनांचे लक्षण काय हे समजून घेतल्याशिवाय, एखाद्याला त्या आहेत, असे म्हणता येणार नाही. प्राण्यांची जी मानसिक स्थिती-परिस्थितीच्या आधारे अगदी जवळ येऊ शकते, ती म्हणजे एखाद्या गाईपासून तिचे वासरू दूर नेले जात असतानाची परिस्थिती याबाबतची नोंद सिंगरने घेतली आहे. येथेही गाईला होणाऱ्या संतापाचे अवमूल्यन करावयाचे नाही. याउलट यातून माणुस आणि प्राणी यांच्यातील एक महत्वाच्या भेदाचे दर्शन घडते.

"अ) माणूस त्याच्या कल्याणामध्ये रस घेऊ शकतो, प्राणी नाही.

ब) माणसाच्या हितसंबंधाचे प्रकार आहेत, प्राण्यांच्या नाहीत.

क) माणसाच्या हितसंबंधांचा एक विस्तारलेला भावनिक भाग असतो, तर प्राण्यांच्या बाबतीत तत्काळ अनुभूतीचा भाग नसतो".[१२]

हे भेद मांडल्यानंतर आपल्याला पुढील निष्कर्ष काढावे लागतील.

१) "माणसाच्या हितसंबंधासारखे हितसंबंध असण्यासाठी आणि त्या रीतीने ते असण्यासाठी दुःखी क्षमता असणे पुरेसे नाही.

२) मात्र, प्राण्यांच्या हितसंबंधासारखे हितसंबंध असण्यासाठी आणि त्या रीतिने ते असण्यासाठी दुःखाची क्षमता पुरेशी आहे.

३) अशा प्रकारचे हितसंबंध असण्यासाठीची परिस्थिती भिन्न असल्याने प्राणी आणि माणसांना हितसंबंध असण्यासाठीचा आधार सारखाच आहे, हा सिंगरचा दावा चुकीचा आहे".[१३]

**प्रतिवाद खंडण :-**

प्राणी माणसांपेक्षा कमी बुध्दीक्षम आहेत म्हणून त्यांना नैतिक अधिकार देता येणार नाहीत. कारण सर्वच माणसे काही बुध्दिक्षम असत नाहीत. त्यांच्यातही मनोविकलांग व लहान बालके कमी बुध्दिक्षम किंवा बऱ्याच वेळी प्राण्यांच्यापेक्षाही कमी क्षमता त्यांच्यात आढळून येते. पण म्हणून काही त्यांना आपण अधिकार नाकारित नाही. म्हणून त्याच आधारावर प्राण्यांनासुध्दा अधिकार नाकारता येणार नाहीत. म्हणून काही बुध्दिक्षमता हा नैतिक समतेच्या तत्वाचा विचार करता काहीही नैतिक महत्व नसलेला मुद्दा आहे, असा दावा सिंगर करतो. या दाव्याशी कोणीही सहमत होईल. वरील विवेचनामध्ये बुध्दिक्षमतेतील फरकांमुळे भेद करता येणार नाही, असे गृहीत धरले आहे.

पण या भेद बुध्दिक्षमतेचा नाही तर विवेकाचा आहे. बुध्दिक्षमतेतील फरक हा श्रेणीचा असतो. उलट विवेक (rationality) नैतिक स्थानाशी संबंधित असल्याने येथे प्रकारामध्येच फरक असतो. विवेकासाठीच्या काही किमान आवश्यकता किंवा परिस्थिती एक तर असतात किंवा नसतात. ती असणाऱ्या घटकाला भविष्य व भूतकाळाचा वेध घेता येतो आणि त्याचे आकलनही करता येते. हे वैशिष्ट्य "केवळ भाषा वापरणाऱ्यांचे आहे, कारण त्यांच्याकडे भविष्याची मांडणी करण्यासाठी आवश्यक, वर्तमानापासून आणि विशिष्टांपासून दूर जाण्यासाठी आवश्यक, सांकल्पनिक उपकरण असते".[१४] विवेक म्हणजे केवळ बुध्दिक्षमतेची उच्च पातळी नव्हे, उलट ती ज्यांना पर्यायांची कल्पना करून उद्दिष्टे ठेवता येतात, त्यांच्यामध्ये ती असते.

दु:खाची क्षमताच समान विचाराचा अधिकार शाबित करते. कारण ही क्षमताच हितसंबंध असण्यासाठीची आवश्यक परिस्थिती आहे आणि म्हणून महत्वाची (अर्थपूर्ण) आहे. त्यातून वर्णभेदाचेही समर्थन होत नाही. पण त्याबरोबरच विवेकही नैतिकदृष्ट्या महत्वाचा आहे. त्याचप्रमाणे विवेकाला आव्हान केल्याने वर्णभेद किंवा लिंगभेदाचे (संभाव्य) समर्थन होण्याची शक्यताही निर्माण होत नाही. त्यामुळे वर्णभेद आणि प्रजातीवाद यांच्यामध्ये साधर्म्य दाखवण्याचा सिंगरचा प्रयत्न येथे अपयशी ठरला आहे. पुढीलप्रमाणे एका ठिकाणी त्यांच्या तत्वांमध्ये काही मर्यादा दिसून येतात.

**सिंगरच्या समतेचा विचार आणि त्याची मर्यादा :-**

सिंगरच्या समतेच्या तत्वाचा विचार करता, त्यामध्ये पुढीलप्रमाणे दोष संभवतो-तो म्हणतो, माणसांचा सारखाच विचार व्हावयाचा असेल तर प्राण्यांचा का नाही, प्राण्यांचा विचार करावयाचा असेल तर वनस्पतींचा का नाही ? त्यास सिंगरचे उत्तर आहे की, "त्यांना वेदना होत नाहीत".[१५] त्यावर असा प्रतिवाद असू शकेल की, वेदना जाणवण्याची क्षमता नैतिकदृष्ट्या संबंधित का मानावयाची ? वेदना जाणवण्याची क्षमता फक्त प्राण्यातच असते, या आधारावर त्याच्या हितसंबंधाचा विचार करावयाचा हा एक प्रकारचा प्राणिवादच झाला. पर्यावरणीय नीतिशास्त्रीय क्षेत्रातील अनेक जण वनस्तपींना वेदना जाणण्याची क्षमता नसते, असे कशाच्या आधारे म्हणू शकतात. डॉ.जगदीशचंद्र बोस यांनी वैज्ञानिक प्रयोगांती हे सिध्द केले आहे की, वनस्पतींमध्ये संवेदना असतात. त्याचप्रमाणे वनस्पतींवर अनेक प्रयोग केले आहेत, त्यानुसार वनस्पती संगीताला किंवा एखाद्या विशिष्ट हेतूने त्याच्या आसपास वावरणाऱ्या व्यक्तीला प्रतिसाद देतात. प्राणी आणि माणसाप्रमाणेच त्यांचेही जीवन असते. ते फुलू शकते, त्यांची भरभराट होऊ शकते किंवा संपू शकते. प्राणी आणि माणसांमध्ये भेद करणाऱ्यांवर सिंगरने जी टीका केली आहे, त्या टीकेसारखेच त्याचे वर्तन प्राणी आणि वनस्पती यांच्यामध्ये भेद करताना झाले आहे.

**थोडक्यात :-**

"प्रजातीवादाच्या नकारामध्ये सारे जीव समान मूल्यचे आहेत, असे अंतभूर्त असण्याची आवश्यकता नाही. स्वभान (Self consciousness), बुध्दिमत्ता, अर्थपूर्ण नाते (sensitive relationship) ठेवण्याची क्षमता आणि तत्सम क्षमता या वेदना देण्याच्या प्रश्नांशी संबंधित नाहीत, कारण वेदना ही वेदना आहे, मग त्या जिवामध्ये वेदनेची क्षमता सोडून अन्य कोणतीही क्षमता असो या क्षमता जीव घेण्याच्या प्रश्नाच्या दृष्टीने महत्वाच्या असतील".[१६] या परिच्छेदाचा असा निष्कर्ष निघतो की,

माणूस हा विवेकी असल्यामूळे त्याला मारता कामा नये, पण एखाद्या प्राण्याला वेदनारहित रीतीने मारले तरी चालेल, असे सिंगरचे मत पडते.

शाकाहाराच्या आपल्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ सिंगरले म्हटले आहे की, अन्नासाठी प्राणी वाढविताना त्यांना वेदना होणार नाही, अशा रीतीने त्यांची जोपासना करण्याचा कोणताही मार्ग नाही. प्राण्यांना मारण्याला त्याचा आक्षेप नाही, याउलट लक्षणीय शारीरिक मानसिक त्रास होईल अशा संगोपन पध्दतीला त्याचा आक्षेप आहे. केवळ व्यापारी पशुपालन केंद्रामध्येच या वेदना होतात, असे नाही तर अगदी आदर्श अशा कुटूंब पध्दतीमध्येही होतात. वासरांना अगदी लहानपणीच आपल्या आईपासून दूर करताना त्यांना मानसिक त्रास होतो, कोंबड्याच्या नैसर्गिक क्रमामध्ये बदल होतो, आणि तत्सम गोष्टी होतात. व्यापारी पशुपालनामध्ये या साऱ्या गोष्टी अत्यंत वाईट पध्दतीने होत असतात. पण लहान पशुपालन केंद्रामध्येही प्राण्यांच्या नैसर्गिक जीवनामध्ये हस्तक्षेप होतो आणि परिणामी त्यांना त्रास होतो. हे सर्व बंद करावयाचे असल्यास व प्राण्यांना खरोखरच मुक्त करावयाचे असल्यास आपण शाकाहारी झाले पाहिजे. शाकाहाराच्या समर्थनाथ तो पुढील मुद्दे मांडतो.

१) माणुस मुळात मांसाहारी प्राणी नाही.

२) वैद्यकीयदृष्ट्या आरोग्यासाठी मांसभक्षण हे तितकेसे योग्य नाही.

३) मांसाच्या माध्यमातून प्रथिने मिळतात हा समज चुकीचा आहे.

कारण प्राणी जेवढे वनस्पती खाऊन त्यापासून मांस बनवितात व त्या मांसाच्या माध्यमातून माणसाला प्रथिने मिळतात. त्याहून जास्त आपण जमिनीवर लागवड करून प्रत्यक्षरित्या त्या वनस्पतींपासून मिळवू शकतो. त्यातून वनस्पती अधिक वाया जाते. म्हणजेच जेवढ्या क्षेत्रातील वनस्पती खाऊन प्राणी आपल्या मांसाच्या माध्यमातून प्रथिने आपल्याला पुरवितात त्याहून कितीतरी अधिक पटीने जास्त आपल्याला प्रत्यक्ष जमिनीतून मिळू शकतात, हे प्रयोगा अंती सिध्द झालेले आहे.

**सारांश :-**

पिटर सिंगरने मांडलेल्या युक्तिवादामध्ये प्राण्यांच्या वतीने केलेल्या युक्तिवादाचे मोठे योगदान आहे. त्याशिवाय उपयुक्ततावादामध्ये प्रत्येक व्यक्तीला सापेक्षरित्या वाटणाऱ्या हितसंबंधांचा विचार केला जातो. त्यामुळे कॅलिकॉटने निदर्शनास आणल्याप्रमाणे, "एखाद्या परिसंस्थेतील निरपेक्ष आंतरसंबंध आणि त्याबरोबर थेट काहीही हितसंबंध न वाटणाऱ्या जाणीवहीन जिवांचा विचार त्यामध्ये केला जात नाही".[१७] तेव्हा असे वाटेल की, पर्यावरणीय नीतिशास्त्रामध्ये सिंगरचा उपयुक्ततवाद फारसे योगदान देऊ शकणार नाही.

तथापि, उपयुक्ततवादामध्ये काही ठोस मुद्दे आहेत. (जे अगदी पर्यावरणीय संदर्भातही सजगत्या नाकारता येण्याजोगे नाहीत) जे प्राणिहक्काच्या संदर्भात महत्वाचे आहेत. उपयुक्ततावादाचा महत्वाचा भाग म्हणजे जाणीवक्षम जिवांच्या हितसंबंधांना किंवा प्राधान्यांना त्यामध्ये समान मूल्य दिले जाते. त्यांना नैतिकदृष्ट्या विचारपात्र समजले जाते. आपल्या विचारामध्ये मानवेतर जिवांच्या हितसंबंधांचा किंवा प्राधान्यांचा, त्याचप्रमाणे नैतिकदृष्ट्या विचारपात्रतेचा समावेश करण्याइतपत आपण काळजी घेतली तर असे दिसेल की, किमान जाणीवक्षम जिवांचा संबंध असलेले पर्यावरणीय प्रश्न सोडवू शकतो.